**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक २०/२०२०** **दिनांक ०९/०३/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०३/२०२० ते ०९/०३/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून १४/०३/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/०३ | ०४/०३ | ०५/०३ | ०६/०३ | ०७/०३ | ०८/०३ | ०९/०३ | | १०/०३ | ११/०३ | १२/०३ | १३/०३ | १४/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.५ | ३०.८ | २९.८ | २९.० | ३०.० | ३०.० | ३०.२ | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३० | ३० | ३० | ३० |
| १४.० | १४.५ | १४.५ | १७.० | १६.० | १३.० | १४.० | **किमान तापमान (अं.से)** | २१ | २० | २० | २० | २१ |
| ० | ० | ० | ४ | २ | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | ० | ० | ० | २ |
| ९० | ९१ | ९३ | ९२ | ९० | ८९ | ८५ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६९ | ८५ | ७४ | ७३ | ७१ |
| ४७ | ५० | ५९ | ५९ | ५७ | ५३ | ४७ | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३७ | ४४ | ३९ | ३० | ३४ |
| ३.८ | ३.६ | ३.८ | ३.६ | ३.८ | ४.० | ४.२ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ५ | ७ | ७ | ६ | ७ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | **वाऱ्याची दिशा** | आ.द. | आ.द. | ई.पू. | ई.पू. | आ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील- | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ५१३०.९ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**
**दिनांक १० ते १४ मार्च २०२० दरम्यान आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भुईमूग** | **शेंगा अवस्था** | • भुईमूग पिकावर मावा, तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही २.५ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• भुईमूग पिकाला ७ ते ८ दिवसांनी पाणी देण्याची व्यवस्था करावी |
| **आंबा** | **फळधारणा** | • फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये (वाटाणा अवस्था), फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या दयाव्यात तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• फळे गोटी ते अंडाकृती आकाराची असताना डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार फळगळ कमी करण्यासाठी, फळाचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, फळामधील साक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० सें.मी. आकाराची कागदी पिशवी लावावी.<br>• हापूस आंबा फळाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी ५५ टक्के तीव्रतेचे गोमूत्र, फळे वाटाण्याचा आकाराची असल्यापासून पुढे आठवड्याच्या अंतराने उपलब्धतेनुसार ३ ते ६ वेळा फवारावे. |
| **काजू** | **फुलोरा ते फळधारणा अवस्था** | • काजू पिकामध्ये उशिराने येत असलेल्या नवीन पालवीवर ढेकण्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडीपासून संरक्षण करण्याकरिता मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• फुलोऱ्या अवस्थेत असलेल्या काजूची फळधारणा वाढविण्यासाठी १० पी.पी.एम. इथ्रेल या संजीवकाची फवारणी फुलोरा अवस्थेत करावी. पाण्याची उपलब्धता असल्यास फुलोरा ते फळधारणा अवस्थेत काजूला पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• काजू बियांचे उत्पादन व बियांचे आकारमान वाढविण्यासाठी प्रति झाड ताज्या किंवा आठ दिवसापर्यंत साठविलेल्या २५ टक्के गोमुत्राची फवारणी (५ लिटर द्रावण) आणि २५ टक्के गोमुत्राची झाडाच्या बुंध्यामध्ये जिरवणी (१० लिटर द्रावण) करावी.<br>• काजू बिया पूर्ण तयार झाल्याशिवाय बियांची काढणी करू नये. काढणी केलेल्या बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवून साठवणूक करावी. |
| **नारळ** | **-** | • किनारपट्टी भागामध्ये नारळ बागेत काळ्या डोक्याची अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असून किडीच्या अळ्या पानाच्या खालच्या भागावर जाळी तयार करून पानांतील हरितद्रव्य खाल्यामुळे पाने करपल्यासारखी दिसून येतात. किडीच्या नियंत्रणासाठी किडलेली पाने काढून नष्ट करावीत आणि १६ मि. ली. डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच किडीच्या जैविक नियंत्रणासाठी प्रति माड किडीच्या १२ अळ्या आढळून आल्यास गोनीओझस नेफटीडीस ह्या परोपजीवी किटकाची ३५०० प्रौढ कीटक प्रति हेक्टरी या प्रमाणात बागेत सोडावेत.<br>• नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा |

| | | |
|---|---|---|
| | | टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| **चिकू** | **फुलोरा ते फलधारणा** | • चिकू बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• चिकू पिकामध्ये फुलकळी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एस. जी. ४.५ ग्रॅम किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा प्रोफेनोफोस ४० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात या पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी ५० टक्के फुले आल्यावर करावी. तसेच किडीच्या सर्वेक्षणासाठी निळ्या रंगाच्या प्रकाशसापळा बागेत बसवावा. |
| **वांगी, मिरची, टोमेटो** | **फुलोरा ते फलधारणा** | • वांगी, मिरची आणि टोमेटो भाजीपाला पिकास ६ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. तसेच रोपांजवळ मातीची भर द्यावी. |
| **कलिंगड** | **फुलोरा ते फलधारणा** | • कलिंगड पिकाला ३ ते ४ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे. पाण्याच्या अनियमित पाळ्या मुले फळे तडकण्याची शक्यता असते.<br>• कलिंगडाच्या फळांचे सूर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी फळे भाताच्या पेंढ्याने किंवा गवताने झाकून घ्यावीत. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |